SCP #147,731

# DAIRYMAN'S DAUGHTER.

# गवळ्याच्या कन्येची गोष्ट.



BOMBAY TRACT AND BOOK SOCIETY.
Maráthí 18mo. Series. 3rd Edition.
4,000 Copies. A. D. 1871.

मुंबईमध्यें ओरिएन्टल छापखान्यांत छापिलें.
सन १८७१.

Price, Half Anna. किम्मत अर्धा आणा.

# DAIRYMAN'S DAUGHTER.

# गवळ्याच्या कन्येची गोष्ट.



BOMBAY TRACT AND BOOK SOCIETY.
Maráthí 18mo Series. 4,000 Copies.
FOURTH EDITION.

मुंबईमध्यें
ओरिएन्टल छापखान्यांत छापिलें.
सन १८७१.

Library Theol Seminary
Princeton N.J.
By the Translator Mrs. E. J. W.

# गवळ्याच्या कन्येची गोष्ट.

देवाच्या खऱ्या भक्तांचे स्वभाव आणि वर्त्तणुकी यांकडे लक्ष लावून त्यांचे सद्गुण कसे वाढतात, हें पाहावयास आनंद वाटतो. बहुतेक गरीब लोकांच्या अंतःकरणांस ईश्वरी कृपेचा उदय प्रकाशित करितो आणि त्यांमध्यें ख्रीस्ताची प्रतिमा पवित्रात्म्याकडून प्रतिबिंबित होती, हें पाहून फार संतोष होतो. पारमार्थिक होण्यास जितक्या अडचणी श्रीमंत लोकांस पडतात तितक्या गरीबांस पडत नाहींत, ह्मणून त्यांचें साळसूदपण व भोळेपण चांगलें दिसून येतें. द्रव्य, मोठेपण, आणि श्रीमंत सोबती यांच्या योगानें ख्रीस्ताला अंगीकारण्या विषयीं पुष्कळ अडचणी प्राप्त होतात. तथापि कितीएक देवाच्या कृपेनें आपला अभिमान व

मोठेपणा व विषयसुख व चैनबाजी यांस नाकारून ख्रीस्तावर विश्वास ठेवितात आणि कोमळ व नम्र व पारमार्थिक होतात, हें पाहून आनंद वाटतो.

परंतु नम्र व धार्मिक लोक पाहावे असी इच्छा असल्यास बहुतकरून जे गरीब व द्रव्यहीन आहेत त्यांमध्यें शोध करावा. गरीब माणसाची झोंपडी हीच देवाचें मंदिर असें बहुधा होत असतें. अस्या ठिकाणीं ख्रीस्तावरील विश्वास व आशा आणि देवाचें सुज्ञान, सामर्थ्य व चांगुलपण हीं समजण्यांत येतात. याविषयीं ही पुढील गोष्ट चांगलें उदाहरण आहे.—

सगुणी ह्मणून गवळ्याची एक कन्या होती. तिची माझी ओळख तिच्या एका पत्रावरून पडली, तें पत्र येणेंप्रमाणें.—

"सन्मान्य प्रियोत्तम उपदेशक यांस सगुणीचे फार फार सलाम.

"आपली ओळख नसून मी आपणास हें पत्र लिहितें याची क्षमा असावी. मी एकदां आपला

उपदेश ऐकिला. तेव्हां होणार जो क्रोध त्यापासून पापी लोकांनी पळावें, असा जो बोध आपण मोठ्या आग्रहाने केला, तो माझ्या मनांत फार ठसला. महाराज, पापी लोकांनी पश्चात्ताप करावा आणि तारण घ्यावें ह्मणून त्यांसाठीं आपण देवाची फार विनंती करावी. तो प्रार्थना ऐकणारा आहे. जे ख्रीस्ताच्या नांवाने मागतात त्यांस दिल्हें जाईल. सर्व लोक ख्रीस्तावर विश्वास ठेवून ह्या धर्मांत येतील आणि खऱ्या देवाचें भजन करतील ती वेळ जवळ आहे, असा भरवसा धरून आह्मी आनंद पावतों. ती वेळ किती सुखकारक होईल बरें? तेव्हां ख्रीस्ताचें राज्य येईल. तेव्हां जसी आकाशांत तसी पृथ्वीवर त्याची इच्छा चालेल, आणि सर्वांस सुख व कल्याण प्राप्त होईल.

“ महाराज, लिहावयास विशेष कारण हेंच कीं माझी एकुलती प्रिय वहीण मेली आहे. ती एथें एका मडमीपासीं चाकरीस होती. परंतु ती फार रोगी पडली, ह्मणून मी तिचा सांभाळ

करायास व तिच्या बदलीवर राहायास इकडे आलें; पण ती आतां मरण पावली आहे.

"मरणापूर्वी ती ह्मणाली कीं येशू आह्मासाठीं फार दुःख सोसून मरण पावला, या गोष्टीची आठवण करून मी प्रभुभोजन घ्यायास इच्छितें. तेव्हां ख्रीस्ताला अंतःकरणपूर्वक कसें स्वीकारावें याविषयीं मी आपल्या शक्तीप्रमाणें तिला सांगितलें. तेव्हां ही गोष्ट तिच्या मनांत ठसून ती मान्य झाली, आणि या नाशवंत व पापी जगापासून ती ईश्वराजवळ सर्वकाळ राहायास गेली, असें मला वाटतें.

"महाराज, आपण येऊन उपदेश करावा, आणि तिला मूठमाती द्यावी असी माझ्या बहिणीची फार इच्छा होती, तर मेहेरबानी करून आपलें येणें होईल असें असल्यास कृपा करून कळवावें. ही विनंती."

हें पत्र पाहून मला फार आनंद वाटला. त्यांतील कांहीं अक्षरें चुकलीं होतीं, यावरून

लिहिणारी ही हलक्या कुळांतली आहे, असें दिसलें, तरी त्या पत्रांतील हासिलावरून ती फार धार्मिक आहे असें समजण्यांत आलें. आणि या देशांत असे लोक थोडकेच आहेत ह्मणून तिजविषयीं मला आश्चर्य वाटलें.

तें पत्र वाचल्यावर हें कोणी आणिलें, ह्मणून म्या पुसलें. तेव्हां तो दारासीं उभा आहे असें कोणीएकानें सांगितलें.

मग मी त्याकडे गेलों. तो माणूस फार सन्मान्य व ह्मातारा असा दिसला. त्याचा चेहरा सुरकुतलेला आणि केंस पिकलेले व लांब होते. त्यानें आपले हात दारासीं टेंकले होते आणि त्याच्या गालांवरून आसवें वाहत होतीं. त्यानें मला पाहून सलाम केला आणि ह्मणाला, "महाराज, म्या आपल्या कन्येकडून पत्र आणिलें. परंतु मला भय वाटतें कीं आपल्यास आह्मी असे श्रम देतों यावरून, हे किती अविचारी आहेत, असें कदाचित् आपल्यास वाटेल."

मी ह्मणालों, "नाहीं, नाहीं. यावयास मी

फार खुशी आहें." नंतर त्या त्याला आंत बोलावून विचारिलें कीं, "तुह्मी काय कामधंदा करीत असतां?"

तो ह्मणाला, "महाराज, एथून सुमारें तीन कोसांवर एक लाहानशी झोंपडी आहे, तींत राहून बहुतकरून मी माझें आयुष्य घालविलें आहे. महाराज, त्यां एक कुरण घेतलें आहे त्यांत कांहीं गाई चारीत असतों आणि दुसरी मजुरी करीत असतों, याकडून माझ्या कुटुंबाचा निर्वाह होतो."

उ०— तुमचें कुटुंब केवढें आहे?

ग०— बायको आतां ह्मातारी व अशक्त होत चालली आहे ती व एक पुत्र आणि एकच कन्या. कारण कीं दुसरी कन्या आतांच हें दुष्ट जग सोडून गेली आहे.

उ०— "ती सुखाच्या जागेंत गेली असेल बरें असें वाटतें.

ग०— बिचारी मुलगी ती आपल्यां बहिणीप्रमाणें चांगल्या मार्गांत चालत नव्हती, तरी ती

आपल्या बहिणीच्या संभाषणावरून पश्चात्तापी होऊन तारण पावली, असा भरवसा आहे. मला असी चांगली मुलगी आहे यावरून केवढी कृपा! ती फार चांगली ख्रिस्ती आहे. ती फार माझी विनंती करून होणाऱ्या क्रोधापासून पळा असें सांगे तोंपर्यंत मी आपल्या जीवात्म्याच्या तारणाविषयीं अगदीं निष्काळजी होतों. मी जनरूढीप्रमाणें दुष्ट मार्गानें चालत असें.

उ०– तुमचें वय किती असेल बरें?

ग०– सत्तरांपेक्षां कांहीं अधिक, आणि माझ्या बायकोचें मजपेक्षांहि अधिक आहे. आह्मी फार ह्मातारीं व अशक्त होत चाललों परंतु ती कन्या आमचा सांभाळ करण्याकारितांच आपली चांगली चाकरी सोडून घरीं आली. ती खचित प्रिय, मान्य, आणि ममताळू, असी मुलगी आहे.

उ०– ती पूर्वींपासून असी होती कीं काय?

ग०– "नाहीं नाहीं, महाराज, जेव्हां ती तरुण होती तेव्हां ती वस्त्रभूषणें, नाच तमाशे,

अश्या नादांत होती. वास्तवीक ह्मटलें तर पूर्वी आह्मी सर्व अज्ञानी होतों. आह्मी केवळ जगिक सुख शोधीत होतों. आह्मी खऱ्या देवाला ओळखीत नव्हतों, आणि त्याचें शास्त्र कधीं पाहिलें नव्हतें. परंतु कांहीं वर्षांमागें माझी वडील कन्या चाकरीवर गेली होती, तेथें ख्रिस्ती शास्त्रांतील उपदेश ऐकण्याचा प्रसंग तिला मिळाला. तेव्हांपासून तिची वर्त्तणूक अगदीं बदलली. ती ख्रिस्ती शास्त्र वाचूं लागली, आणि आपले सर्व वाईट मार्ग सोडून सुधारली. नंतर कांहीं दिवसांनी ती आह्माला भेटायास आली, तेव्हां तिनें आपल्या पगारापैकीं दाहा रुपये आह्माला दिल्हे आणि ह्मणाली कीं तुह्मी आतां ह्मातारीं होत चाललां आहां ह्मणून मला तुमचें सहाय केलें पाहिजे. मजवर ख्रीस्ताने मोठी दया केली आहे, ह्मणून म्यां आतां आपला पैसा वस्त्रभूषणें इत्यादिकांत उडवावा यापेक्षां आपल्या प्रिय आईबापाचें उतराई व्हावें, हें मला बरें वाटतें.

"हें तिचें बोलणें ऐकून आह्मास फार आश्च-

यें वाटलें. ती पहिल्यापेक्षां अगदीं वेगळी झाली. आणि तिचा स्वभाव व वर्त्तणूक नम्र, सौम्य आणि कृपाळू असतां, ती आमच्या शरीराच्या व आत्म्याच्या कल्याणाविषयीं इतकी उत्कंठित होती कीं तिच्यासंगतीं असावें यांत आह्मांला फार सुख वाटलें, आणि आमची असी खातरी झाली कीं हा तिचा धर्म खरा आहे, नाहीं तर तिचा स्वभाव एकाएकीं असा बदलला नसता.

"त्या वेळेस तिची धाकटी बहीण हसून व थट्टा करून तिला ह्मणे कीं, 'ताई, या नव्या धर्माकडून तुझें डोकें फिरलें.' तेव्हां ती ह्मणे, 'नाहीं नाहीं, माझ्या प्रिय बहिणी, माझें डोकें नव्हे, परंतु माझें अंतःकरण पापापासून ईश्वराकडे फिरलें आहे, असें मला वाटतें. हल्लीं तुझी अवस्था केवढी भयाची आहे हें जसें मला दिसतें, तसें तुलाहि दिसून यावें, असी माझी फार इच्छा आहे.'

"तिची लाचार बहीण ह्मणे कीं 'तुझा उपदेश ऐकावा असी माझी इच्छा नाहीं. मी

दुसऱ्या लोकांपेक्षां अधिक वाईट नाहीं. मी जनरूढीप्रमाणें चालतें एवढें मला पुरें आहे.'

"सगुणी ह्मणाली, 'बरें, माझ्या प्रिय बहिणी, जरीं तूं माझें ऐकत नाहींस, तरीं मला तुज-साठीं प्रार्थना करायास तुझ्यानें अडथळा करवत नाहीं, मी मनापासून प्रार्थना करीत जाईन.'

"महाराज, आतां तिची प्रार्थना सफळ झाली आहे असें मला वाटतें. कारण कीं जेव्हां तिची बहीण रोगी पडली, तेव्हां सगुणी तिच्या बदलीवर राहायास आणि तिचा सांभाळ करा-यास गेली, आणि तिनें तिच्या आत्म्याविषयींहि बहुत बोध केला. यावरून ती गरीब मुलगी विचार करूं लागली आणि आपलीं पापें पदरांत घेऊन आपल्या बहिणीच्या कृपाळूपणाविषयीं फार उपकारी झाली, ह्मणून ती तारण पावली आहे, असें सगुणीला वाटतें. ती रोगी असतां जेव्हां माझी बायको व मी तिच्या समाचारास गेलों, तेव्हां ती ह्मणाली कीं, मी आपल्या मागील वर्त्तणुकीमुळें फार लज्जित आणि पश्चात्तापी

झालें आहें. परंतु ईश्वराच्या कृपेनें माझ्या बहिणीचा जो तारणारा तो माझाहि तारणारा होईल असी माझी आशा आहे. मी केवढी पापी, मी किती लाचार आहें; असें मनांत आणून तिने तारणासाठीं ख्रीस्तावर आशा धरिली.

"महाराज, आतां ती मेली आहे. तिचें मन देवाकडे फिरावें ह्मणून तिची बहीण जी प्रार्थना करीत असे ती सफळ झाली, असा मला भरवसा आहे."

असें संभाषण झाल्यावर त्या सगुणीची विनंती पूर्ण करावी आणि तिला भेटावें ह्मणून मी फार उत्कंठित झालों, आणि शुक्रवारीं नेमलेल्या वेळेस मी येतों, असें त्या ह्मातार्‍या गवळ्यास वचन दिल्हें. मग त्याच्या संकटाविषयीं कांहीं संभाषण झाल्यावर तो गेला.

तो ह्मातारा सन्मान्य माणूस होता. सुरकुतलेले गाल व पिकलेले केंस व अश्रूंनी भरलेले डोळे व लवलेले खांदे आणि अशक्तपणाने चालणें हीं त्या ह्मातार्‍या गवळ्याचीं लक्षणें होतीं.

जी काठी पुष्कळ वर्षांपासून त्याजवळ होती ती टेंकीत टेंकीत तो हळू हळू चालूं लागला अ-सतां जे विचार माझ्या मनांत आले त्यांच्या स्मरणावरून मला आनंद वाटतो.

नंतर नेमलेल्या वेळेस मी मसणवटीकडे गेलों. तेथें तीं म्हातारीं खिन्न आईबापें, व बहीणभावंडें आणि नातलग हीं माझ्या दृष्टीस पडलीं ज्या मुलीनें मला पत्र पाठविलें, तिचा नम्र व धार्मिक चेह-रा पाहून मला संतोष झाला. ती भोळी, फार गंभीर, आणि शांत असी दिसली.

मी उपदेश करीत होतों त्या वेळेस एक गां-वकरी पाहायास आला होता, त्याच्या मनांत दे-वाची गोष्ट ठसली. मी पापी व दंडपात्र आहें असी त्याची खातरी झाली, आणि त्या दिवसापा-सून त्यानें सर्व वाईट कामें सोडून सुमार्ग धरिला. त्यानें ख्रीस्तावर विश्वास ठेविला असें प्रमाण पटलें. यावरून तो प्रसंग पक्की आठवण राहा-ण्याजोगा झाला.

उपदेश झाल्यानंतर तीं चांगलीं म्हातारीं

आईबापें व त्यांची कन्या सगुणी यांजबरोबर थोडें संभाषण झालें. सगुणीची चाल मला चांगली दिसली. नंतर तुमच्या भेटीस पुन्हा येईन असें सांगून मी निघालों. त्या वेळेपासून त्यांची माझी फार ओळख पडली.

गरिबांच्या देवाची आपण स्तुति करूं; आणि गरीबानी विश्वासाने धनवान, आणि धनवानानी आत्म्याने गरीब व्हावें, असी त्याची प्रार्थना करूं.

मरून गेलेल्या मित्रांसीं आमचें जें दळणवळण पडलें होतें त्यांची आठवण करावी हें आह्मास गोड वाटतें. विशेषेंकरून जे धार्मिक असून आणि ख्रीस्तावर विश्वास ठेवून मेले आहेत, त्यांविषयीं आठवण करण्याने आह्मास फार आनंद होतो. ते आतां आकाशलोकीं अत्यंत सुख भोगीत आहेत. जे ईश्वराचे भक्त आहेत ते सर्व थोड्या दिवसानी तेथें पोहंचून ईश्वरी गौरव पाहतील, आणि सर्वकाळपर्यंत त्याची स्तुति करतील. ते इहलोकीं दरिद्री किंवा धनवान असोत, तरी

आतां ईश्वरापाशीं राजे आणि उपाध्ये होऊन अक्षय सुख भोगीत आहेत, असा भरवसा धरून आह्मी फार हर्ष पावतों.

मरून गेलेले मित्र ज्यांशीं देवाच्या राज्यांतील गौरव व कृपा यांविषयीं संभाषण करायास मला सुख वाटलें, त्यांतील एक ही गवळ्याची कन्या आहे. तिची गोष्ट सर्व वाचणाऱ्यांस बोधकारक आणि उपयोगी होईल, असें मला वाटतें, ह्मणून तिजविषयीं अणखी सांगतों.

धाकल्या बहिणीला मूठमाती दिल्ह्यावर सुमारें एका सतकाने मी त्या कुटुंबाला भेटायास गेलों. त्यांच्या घराचा रस्ता आडवळणी व अरुंद होता. त्याच्या दोहीं बाजूंस अनेक प्रकारचीं झाडें, जीं आपले शेंडे कमानीसारिखे लवऊन वाटसरास सूर्याच्या किरणांपासून झांकीत असीं होतीं. दोहींकडे सुंदर फुलें आणि लाहान झाडें व झुडपें वाढलीं होतीं. आणि ठिकाणोठिकाणीं वेडेवांकडे खडक आणि त्यांपासून पाण्याचे लाहान झरे वाहत होते. ही सर्व रचना अद्भुत आणि

मनोरंजक दिसली. रस्त्याच्या बाजूनीं कोठें कोठें खिंडी आणि कोठें कोठें विरळ झाडें होतीं त्यांमधून देशाची सुंदर मांडणी फार लांबून दिसण्यांत आली. उंच डोंगर व त्यांच्या माथ्यावर नौकानिशाणांचे खांब आणि सुपीक शेतें, तसेंच कोठें कोठें रस्ता डोंगरावरून गेला होता ह्मणून समुद्र व त्यांतील तारवें हीं फार सुंदर दिसलीं. परंतु छायायुक्त एकांतवास आणि लाहान व सुंदर झुडपें व फुलें हीं त्या रस्त्याचीं विशेष लक्षणें होतीं, आणि यांवरून विचार करावा असें मनांत सुचलें. सृष्टींतील आश्चर्यकारक व सुंदर कामांविषयीं जे विचार करीत नाहींत त्यांचें केवढें नुकसान होतें! सृष्टिजनक ईश्वर आपल्या कामामध्यें केवढ्या गौरवानें प्रगट होतो! ईश्वरानें मला उत्पन्न केलें ह्मणून स्पष्ट बोलत नाहीं असें कोणतेंहि झाड, अथवा पान, अथवा फूल, अथवा कोणताहि पक्षी अथवा जीवजंतु नाहीं.

मी तो भला ह्मातारा गवळी राहत होता तेथें पोहंचलों, तेव्हां तो लाहान शेतामध्यें थोड्या

गाईंस गोठयाकडे वळवीत आहे असा माझ्या दृष्टीस पडला. मी त्याजवळ गेलों तरी त्याने मला पाहिलें नाहीं, कारण कीं त्याची दृष्टि मंद झाली होती. मग म्यां त्याला हाक मारली, तेव्हां तो माझा शब्द ऐकतांच डचकला. तथापि आनंदयुक्त चेहऱ्याने माझें आगतस्वागत करून ह्मणाला, महाराज, फारफार सलाम. आपण आलां यावरून आह्माला फार संतोष आहे. या आठवड्यांत रोज रोज आह्मी तुमची वाट पाहत आहों.

नंतर झोंपडीचें दार उघडून त्याची कन्या व तिची ह्मातारी आई बाहेर आल्या. त्यानी मला पाहतांच, ज्या कबरेजवळ त्या मला पहिल्याने भेटल्या होत्या, ती त्यांच्या मनांत आली. त्यानी आनंदाने व प्रेमाश्रूने माझें आगतस्वागत केलें, आणि लाहान सुंदर बागांतून मला घरांत नेलें. तें घर आंतून बाहेरून स्वच्छ व ठाकठिकीचें आहे, असें दिसून आलें. ही झोंपडी धार्मिकपण, शांति, आणि समाधान राहण्याजोगी

आहे, असें मला वाटलें. हे सद्गुण त्या अधिक चांगले समजावे ह्मणून ईश्वराने माझें येणें सफळ करावें असी त्यां प्रार्थना केली.

सगुणी ह्मणाली, "महाराज, आपण आमच्या झोंपडींत यावें असे आह्मी योग्य नाहीं. आपण इतके लांबून आह्मास भेटण्यासाठीं आलां याव- रून आह्मी फार उपकार मानितों."

उप०—"आमचा धनी यापेक्षांहि फार लांबून आह्मा पाप्यांला भेटायास आला. तो आप- ल्या बापाचा ऊर व आपलें गौरव सोडून या जगांत दयेच्या आणि प्रीतीच्या कामावर आला. आणि आह्मी त्याला अनुसरतों असें जर ह्मणतों, तर आह्मींहि त्यासारिखींच एकमेकांचीं दु:खें सोसावीं आणि सर्वांचें हित पाहावें, हें योग्य आहेना ?"

इतक्यांत तो ह्मातारा आंत आला, आणि त्यानें पुन्हा माझें फार आगतस्वागत केलें. मग लवकरच कन्येच्या मरणाविषयीं संभाषण होऊं लागलें. तेव्हां सगुणीच्या संभाषणावरून तिचा

स्वभाव धार्मिक व चांगला आहे, असें माझ्या दिसण्यांत आलें. "ख्रीस्तानें मजवर केवढी दया व प्रीति केली आहे, त्यां ईश्वराचे उपकार मानून त्याचें गौरव आणि काम यांविषयीं किती तत्पर असावें ?" अश्या तिच्या बोलण्यावरून तिची चांगली बुद्धि व उत्तम रीति पाहून मला आश्चर्य वाटलें. माझें येणें तिला व तिच्या आईबापांला सफळ व्हावें ह्मणून ती फार उत्कंठित आहे असी दिसली. तथापि तिची वर्त्तणूक अमर्यादेची किंवा मतलबी नव्हती. तिजमध्यें ख्रिस्ती मनुष्याची स्थिर बुद्धि व आस्था आणि स्त्रियेची मर्यादा व कन्येचें आज्ञाधारकत्व हे गुण होते. तिचा स्वभाव व संभाषण हीं शुभवर्त्तमानाप्रमाणेंच आहेत हें समजल्यावांचून तिच्या संगतीं कोणाच्यानें राहवेना.

तीं आपल्या आईबापांच्या ध्यानांत खरें ज्ञान आणि अनुभव आणून द्यावयास किती उत्कंठित होती आणि तिचे प्रयत्न किती सफळ झाले होते हें लवकरच माझ्या समजण्यांत आलें. हें तरुण

ख्रिस्ती लोकांस फार शोभतें. आईबाप अज्ञानी व पापमार्गांत असतां, जर देवानें दया करून त्यांच्या लेंकरांचें मन फिरविलें, तर त्यानीं आपल्या आईबापांच्या तारणाविषयीं किती काळजी बाळगावी ! देवाच्या कृपेनें जी मैत्री उत्पन्न होती तिजकडून जेव्हां भाऊबंद ख्रिस्ती होतात तेव्हां किती कल्याण आहे बरें !

ही आह्मांला धर्ममार्ग दाखविती असें ते ह्माद्वारें आईबाप मानीत असत. असें असतां ती सर्व गोष्टींविषयीं त्यांस मान्य असून घरांतील कामकाजहि मोठ्या खुशीनें करीत असे.

त्या तरुण स्त्रीचें धार्मिकपण विशेष आणि साधारण लोकांपेक्षां अधिक होतें. तारणोपायाविषयीं तिचें मत योग्य आणि शास्त्राप्रमाणें होतें. ख्रिस्ती धर्माप्रमाणें चालण्यांत जो आनंद आणि ज्या अडचणी प्राप्त झाल्या त्यांविषयीं ती वारंवार बोलत असे. तिला असें वाटे कीं देवाची खरी ओळख व्हावी ह्मणून ख्रीस्तावर असा भरव-

सा ठेवावा कीं आपण प्रीतीनें त्यासारिखें व्हावें. पाप्यांवरील देवाची प्रीति, ही, आणि ज्या मार्गानें त्यानीं चालावें तो मार्ग, कधीं बदलत नाहीं, हें तिला पक्कें ठाऊक होतें. त्या प्रीतीवर भरवसा ठेवून, आणि त्या मार्गांत प्रीतिपूर्वक चालून, देवाची जी शांति समजण्यापलीकडे आहे ती तिनें संपादन केली. कारण कीं "तो याप्रमाणें आपल्या प्रियास विसांवा देतो."

तिनें शास्त्राशिवाय दुसरीं पुस्तकें थोडींच वाचलीं होतीं, तरी तीं उत्तम होतीं. ती त्या पुस्तकांविषयीं, त्यांतील अर्थ समजल्यासारिखें बोलत असे. शास्त्र आणि भजनपद्धति यांशिवाय डाडिज यानें केलेलें सद्गुणाचा आरंभ व वृद्धि यांविषयींचें पुस्तक; विश्वासानें वांचणें, चालणें आणि जय पावणें यांविषयींचें रोमैनानें केलेलें पुस्तक, बन्यानानें केलेलें यात्रिकक्रमण, आलेनानें केलेलें भयसूचक पुस्तक, संतांचा निरंतर विसांवा या नांवाचें बाक्स्तरानें केलेलें पुस्तक, एक गीतांचें पुस्तक, आणि थोडीं दुसरीं होतीं.

तिचा चेहरा नाजूक व म्लान होता, यावरून तिजवर क्षयाची छाया आहे, असें दिसून आलें, आणि ती केवळ थोडीं वर्षें वांचेल, असें मी अनुमान केलें. या भेटीनंतर सुमारें दीड वर्षानें तिला ईश्वराज्ञा झाली.

मी या चांगल्या कुटुंबांत असतां ती वेळ फार लवकर गेली. मग कांहीं साधें व चांगलें जेवण झाल्यावर व कांहीं वेळ त्यांजसीं संभाषण केल्यावर मी घराकडे यायास निघालों. तेव्हां सगुणी ह्मणाली, "महाराज, आपले उपकार मजवर व माझ्या लोकांवर फार झाले. आपलें येणें सफळ झालें, असें मला वाटतें. यापूर्वीं कोणी उपदेशक एथें आला नव्हता, ह्मणून आपल्या येण्याकडून आह्मास फार आनंद झाला. आणि याची आठवण निश्चयें माझ्या आईबापांस राहील, असें मला वाटतें. माझ्या तारणाऱ्यानें मला अग्नींतून कोलितासारिखें काढावें आणि जीवनाचा व शांतीचा मार्ग दाखवावा यांत केवढी कृपा आहे, त्याच्या गौरवासाठीं वांचावें, असी माझी

फार इच्छा आहे. परंतु या माझ्या आईबापांनीहि धर्मावरून समाधान पावावें असें मी इच्छितें."

उप०– "सायंकाळीं प्रकाश होईल, हें वचन त्यांविषयीं पूर्ण झालें, असें उघड दिसतें."

स०– "होय, पूर्ण झालें, असी मीं विश्वासतें, आणि हा भरवसा धरून मी ईश्वराची स्तुति करितें."

उप०– "तुझ्या प्रयत्नांकडून ते खऱ्या धर्मांत आले यावरूनहि त्वां देवाचे उपकार मानावे.

स०– "मानितें महाराज, पण जेव्हां मी आपली अयोग्यता मनांत आणितें, तेव्हां भयाने आनंद करितें."

तेव्हां तो भला म्हातारा गवळी म्हणाला, "महाराज, ईश्वर आपणाला या कृपेचें प्रतिदान देईल असी माझी खातरी आहे. आम्ही फार पापी आहों, तरी ईश्वराने म्हातारपणीं आम्हावर दया करावी म्हणून आपण त्याची प्रार्थना करावी. ही गरीब सगुणी शरीराने व आत्म्याने आम्हाविषयीं फार प्रयत्न करिती.

आह्मास श्रम न पडावे ह्मणून ती सदीस आपल्या शक्तीपलीकडे श्रम करिती, असें भय वाटतें. मग आह्मी होणाऱ्या क्रोधापासून सुटावें ह्मणून ती आ-ह्माबरोबर संभाषण करिती, वाचून दाखविती, आणि प्रार्थना करिती. महाराज, खचीत अ-शी कन्या फार विरळा आहे."

मी त्यांस आशीर्वाद देऊन व सलाम सांगून निघालों.

घरीं येतांना जे विचार माझ्या मनांत आले, ते गोड व उपयोगाचे होते. पुढें मी वारंवार त्या शांतीच्या झोंपडीकडे गेलों; आणि तेथील संभाषणावरून जें सुख म्यां अनुभविलें, त्यावरून देवाचे उपकार मानण्याचें नवें कारण झालें.

त्या कन्येची प्रकृति लवकर अधिक क्षीण होत चालली. खोल गेलेले डोळे व अतिशय खोकला आणि लाल गाल या लक्षणांवरून ती क्षयरोगानें मरणाच्या पंथास लागली आहे असें दिसण्यांत आलें.

परंतु उपदेशक आणि ख्रिस्ती मित्र यांस लोकांच्या तारणाविषयीं प्रयत्न करायास या क्षयरोगाकडून किती चांगले प्रसंग मिळतात, असें वारंवार माझ्या मनांत येत असतें. याकडून ईश्वर हितकारक बोधासाठीं व पश्चात्तापासाठीं अवकाश आणि प्रसंग देतो असें दिसतें. परंतु असे किती प्रसंग व्यर्थ जातात. ज्यांविषयीं ह्मणण्यांत येईल कीं यांस शांतीचा मार्ग कळला नाहीं, कारण कीं होणाऱ्या क्रोधापासून पळून जायास कोणी मित्रानी त्यांस कधीं बोध केला नाहीं, असे किती आहेत बरें !

परंतु सर्वकालिक शांति होण्यासाठीं काय केलें पाहिजे, हें त्या गवळ्याच्या कन्येने हा रोग लागल्यापूर्वींच जाणलें होतें. मी तिजकडे गेलों तेव्हां जें संभाषण झालें, तें सर्वदां तिला, असें केवळ नव्हे, तर मलाहि बोधकारक झालें. तिचें मन शास्त्रांतलि वाक्यानी भरलें होतें, आणि तिचें संभाषण फार उपयोगाचें होतें. जेव्हां त्या

संभाषणाची आठवण होती तेव्हां मी आपल्या मनांत देवाचे उपकार मानितों.

एका दिवसीं तिने मला एक चिटी पाठविली, ती असी कीं,

"महाराज, मज पापिणीला भेटायास येण्याची जर आपणाला फुरसद होईल, तर मला फार आनंद वाटेल. माझें आयुष्य बहुतकरून भरत आलें आहे. परंतु ख्रीस्त माझ्या आत्म्याला अमूल्य आहे. आपलें संभाषण वारंवार माझ्या उपयोगी पडलें आहे आणि आतां त्याची विशेष गरज आहे. माझ्या आईबापांनी आपणास सलाम सांगितला आहे. तुमची अयोग्य व आज्ञांकित चाकरीण सगुणी इचा सलाम."

त्याच दिवसीं संध्याकाळीं मी गेलों, आणि गवळ्याच्या घरीं पोहंचलों असतां त्याच्या बायकोने दार उघडलें. तिने आपलें डोकें हालवून आसवें गाळिलीं. तिचें अंतःकरण दुःखाने भरलें होतें. तिने मजसीं बोलायास प्रयत्न केला, परंतु गहिंवरामुळें तिच्याने बोलवेना. मी तिचा

हात धरून ह्मणालों, "माझ्या प्रिय मित्रिणी, सर्व योग्य आहे, आमचा ज्ञानी व कृपाळू प्रभु इच्छितो त्याप्रमाणें होतें."

आ०— "महाराज, हाय हाय! माझी प्रिय सगुणी फार रोगी आहे. मी तिजवांचून काय करूं? मी अगोदर मरेन असें मला वाटत होतें, परंतु—"

उप०— "परंतु तुह्मी मरण पावल्यापूर्वी आपल्या लेंकरांस आकाशलोकीं जातांना पाहावें असी ईश्वराची इच्छा असल्यास यांत कांहीं कृपा नाहीं कीं काय?"

आ०— "अहो महाराज, मी फार ह्मातारी व अशक्त आहें, आणि ती प्रिय कन्या माझी काठी व टेंका आहे."

मी आंत गेलों असतां, सगुणी शेगडीजवळ डोलखुर्चीवर तक्याच्या टेंक्यानें बसली आहे, असें दृष्टीस पडलें. ती तीन चार सप्तकांनीं मरेल असें मला वाटलें, तरी तिचा निस्तेज चेहरा आनंदयुक्त व हास्यमुख दिसला.

स०—"महाराज, आपण इतकें लवकर आलां यावरून मजवर फार उपकार झाले. मी रोज रोज अधिक झिजणीस लागलें आहें. माझें राहणें एथें फार वेळ होणार नाहीं. माझें शरीर व अंतःकरण फार खचलें आहे, परंतु ईश्वर माझ्या अंतःकरणास शक्तिरूप आहे, आणि तो सर्वकाळपर्यंत माझा वांटा होईल असी माझी आशा आहे."

पुढें कांहीं संभाषण झालें, परंतु खोकला व दमा यांजकडून कांहीं अडचण होई. ती अशक्त झाली होती, तरी तिचा स्वर स्पष्ट होता, तिची चाल गंभीर व मन स्थिर होतें. तिची दृष्टि कांहींसी मंद झाली होती, तरी संभाषण करते वेळेस तीव्र असी दिसली. तिचें योग्य बोलणें ऐकून मला वारंवार आश्चर्य वाटत असे. तिची बुद्धि मूळची चांगली होती आणि ख्रिस्ती होण्याकडून देवाच्या कृपेने जसें बहुतकरून घडतें तसी ती अधिक चांगली झाली. त्या वेळेस कृपा व स्वाभाविक बुद्धि यांची शक्ति फार प्रबळ होती,

यावरून सगुणी विशेष कृपापात्र आहे, असें दिसलें.

तिची म्हातारी आई मोठ्या काळजीने आपल्या कन्येकडे प्रेमदृष्टीने पाहत होती, आणि मी त्या दोघींमध्यें बसून सगुणीला म्हणालों.

"ईश्वर तुजजवळ आहे आणि ज्याने तुला सर्वदां राखिलें आहे, तो, जेथें पवित्र लोक अक्षय सुख भोगितात, तेथें तुला नेईल असा तुझा भरवसा आहे कीं नाहीं ?"

स०—"होय महाराज, अलीकडे कांहीं संशय वाटत होता, परंतु ही गोष्ट शरीराचें दुःख व अशक्तपण यांजकडून कांहींसी घडली, आणि कांहीं सैतानाच्या हेव्याकडून घडली असें वाटतें. ख्रीस्त मजवर प्रीति करीत नाहीं आणि मी केवळ ढोंगी आहें, असें तो माझ्या मनांत आणितो."

उप०—"तूं त्याचें ऐकतीस कीं काय ? एवढी कृपा मिळाली असतां, तुझ्याने संशय धरवतो काय ?

स०—"नाहीं नाहीं महाराज, ख्रीस्ताच्या प्रीतीविषयीं बहुतकरून पक्कें प्रमाण दिसतें. त्यानें मजवर दया केली असतां, नाहीं केली, असें ह्मणण्याकडुन अधिक पाप करावें, असी माझी इच्छा नाहीं. त्याची स्तुति व गौरव व्हावें ह्मणून मी कबूल करितें.

उप०—"तुझें मन देवाच्या कृपेनें त्याकडे वळल्यापूर्वीं तूं कसी होतीस?"

स०—महाराज, मी गर्विष्ठ, व अविचारी असी मुलागी होतें. मला वस्त्रभूषणांची आवड फार होती. मी हें जग व जागिक पदार्थ यांजवर फार प्रीति करीत असें. मी संसारिक लोकांची चाकरी करीत असें. जे खऱ्या देवाला भजतात व आपल्या चाकरांच्या तारणाविषयीं कांहीं चिंता करितात, अस्या लोकांची चाकरी म्यां कधीं केली नाहीं. अधर्माविषयीं अभिमानी असतां मी ख्रिस्ती लोकांचा द्वेष व थट्टा करीत असें. खरा तारणोपाय मला माहितच नव्हता.

म्यां देवाची प्रार्थना कधीं केली नाहीं. परंतु चांगली अब्रू मिळवावी ह्मणून फार वाईट आचरण मात्र केलें नाहीं. खरा देव व ख्रीस्त जो तारणारा त्याची कांहीं ओळख मला नव्हती. मी तारणाविषयीं निष्काळजी होतें, आणि जर त्या वेळेस मेली असतें तर खचीत नरकांत पडलें असतें."

उप०—"ज्या उपदेशाकडून देवाच्या कृपेने तुझें मन पालटलें तो ऐकून किती वेळ झाला?"

स०—"सुमारें पांच वर्षें झालीं."

उप०—"हें कसें घडलें ?"

स०—"कोणीएक मिशनेरी साहेब येऊन उपदेश करणार आहे, असें म्यां ऐकिलें. आणि आपण जाऊन तो उपदेश ऐकावा, असें माझ्या मनांत आलें. परंतु बहुत लोकांनीं सांगितलें कीं तूं जाऊं नको. तो लोकांस बाटवितो. तथापि आपलें नवें लुगडें लोकांस दाखवावें आणि गमत पाहावी, या हेतूने मी गेलें. खचित सांगतें महाराज, जाण्यास यापेक्षां चांगला हेतु नव्हता,

तरी देवानें आपल्या गौरवासाठीं असें घडविलें.

"मी देवळांत गेलें तेथें लोकांची फार दाटी होती, कांहीं वेळपर्यंत म्यां उपदेशकाकडे लक्ष लाविलें नाहीं; परंतु लोकांनी माझा नवा पोषाक पाहावा, असें इच्छिलें. माझें मन किती पोकळ व हलकें आहे, हें माझे डागिने व पोषाख यांवरून उघड दिसून आलें.

"त्या उपदेशकानें शास्त्रांतील वाक्य वाचिलें, तें येणेंप्रमाणें—'तुह्मी नम्रता पांघरलेले असा.' त्यानें शरीराचें पांघरूण व आत्म्याचें पांघरूण यांची तुलना करून दाखविली तेव्हां माझ्या सुंदर पोषाखाच्या आवडीविषयीं मला लाज वाटूं लागली. परंतु तारणाचें वस्त्र जें ख्रिस्ती लोक पांघरतात, त्याचें वर्णन जेव्हां तो करूं लागला तेव्हां माझा आत्मा उघडा आहे, हें बरोबर माझ्या समजण्यांत आलें. नम्रता अथवा ख्रिस्ती माणसाचें एकहि लक्षण मजमध्यें नाहीं, असें म्यां पाहिलें. माझ्या सुंदर पोषाखाच्या गर्वाविषयीं मला फार लाज वाटली. मग म्यां उपदेशकाकडे पा-

हिलें, तेव्हां तो माझे डोळे उघडण्यासाठीं आकाशांतून पाठविलेला दूत आहे, असा दिसला. त्यां मंडळीकडे पाहिलें, तेव्हां जसें मला वाटतें तसें दुसऱ्या कोणाला वाटतें कीं काय, असें माझ्या मनांत आलें. मी आपल्या अंतःकरणाकडे पाहिलें तेव्हां तें पापानें भरलें आहे, असें दिसलें. उपदेश ऐकून मला भय वाटलें, तरी माझें अंतःकरण त्याकडे ओढलें गेलें.

"तारणोपाय सिद्ध करण्याकडून देवाची मोठी कृपा झाली याविषयीं तो बोलूं लागला असतां, माझ्या जिण्याविषयीं मला आश्चर्य वाटलें. ख्रीस्त जो तारणारा तो नम्र, दीन व धार्मिक होता, असें त्यानें दाखविलें, तेव्हां मी गर्विष्ठ, हेवायुक्त, व मतलबी आहें, असें मला वाटलें. ख्रीस्त हा ज्ञानरूप आहे, असें त्यानें दाखविलें, तेव्हां मी अज्ञानी आहें, असें मनांत आलें. ख्रीस्त हा पुण्यरूप आहे असें दाखविलें, तेव्हां मी केवळ दोषी आहें असी माझी खातरी झाली. ख्रीस्त हा पवित्र करणारा आहे, असें त्यानें प्रमाण पटविलें, तेव्हां

मी अपवित्र आहें, असें स्पष्ट दिसलें. खीस्ताकडून तारण होईल, असें कळविलें, तेव्हां मी पापाची व सैतानाची दासी आहें, अशी खातरी झाली. शेवटीं त्याने आपला उपदेश पाप्यांस लागू करून ह्मटलें कीं, तुह्मी होणाऱ्या क्रोधापासून पळून जा. तुह्मी अलंकारांवरील प्रीति टाका, आणि खीस्ताला अंगीकारून खरी नम्रता पांघरलेले असा.

"त्या वेळापासून मी आपल्या आत्म्याच्या मोलाविषयीं व पापावस्थेच्या भयाविषयीं कधीं विसरलें नाहीं. जरी मला फार भय वाटलें, तरी त्या उपदेशामुळें मी देवाची स्तुति केली.

"उपदेशकाने माझा मुख्य छंद ह्मणजे पोषाखाविषयींचा गर्व, हा उघड केला, आणि देवाच्या कृपेने त्याचा उपदेश माझ्या मनांत ठसला. मजसारिख्या दुसऱ्या गरीब कन्या, ह्या बाहेरील शोभेची आवड टाकून देवाच्या दिसण्यांत फार मोलवान असा नम्र व शांत स्वभाव पांघरतील, तर किती बरें!

"त्या लोकांनी बहुतकरून असा उपदेश अगोदर कधीं ऐकला नव्हता. ह्मणून ते कुरकूर करून उपदेशकाचा द्वेष करूं लागले, तरी त्यामध्यें मजसारिखे, ज्यांच्या मनांत उपदेश ठसला असे कित्येक होते. आणि त्यांनी आणखी ऐकायास इच्छिलें, परंतु तो उपदेशक पुन्हा कधीं आला नाहीं.

"मला कोणी धर्म सांगणारा नव्हता, परंतु म्यां थोडीं पुस्तकें मिळविलीं आणि एकांतीं बसून तीं वाचीत आणि प्रार्थना करीत असें, त्यावरून मी फार पापी व दंडपात्र आहें आणि मला तारायाला ख्रीस्तानें दुःख सोसिलें यांत अत्यंत दया आहे, असें मनांत आलें. अहो महाराज, मला किती मोलवान तारणारा सांपडला आहे! म्यां मागावें किंवा इच्छावें त्यापेक्षां तो अधिक आहे. तो माझ्या सर्व गरजा पुरवितो. त्याच्या उरासीं टेंकल्यानें मला सर्व पापें आणि दुःखें यांजपासून विसावा मिळतो, आणि त्याचें वचन सर्व संशय व अविश्वास दूर करायास शक्ति देतें."

उप०— "तारण हें आपल्या सुकृतानी नव्हे, पण देवाच्या कृपेनेच असावें, असी तुझी खातरी लवकर झाली नाहीं काय ?"

स०— महाराज, तो उपदेश ऐकल्यापूर्वी माझें सुकृत काय होतें ? मी केवळ वाईट, लोभिष्ट, मतलबी व दुष्ट होतें. लाहानपणापासून माझ्या मनांतील कल्पना सर्वदां दुष्ट होत्या. माझी योग्यता तर काय सांगावी. निष्काळजी व भ्रष्ट झालेला जो कोणी देवाच्या आज्ञांविषयीं कांहींच चिंता धरीत नाहीं, त्यासारखी होतीं. होय महाराज, माझें तारण होईल तर देवाच्या कृपेनेच होईल, असें लवकर समजण्यांत आलें."

उप०—"जगिक सुख तुला कसें वाटूं लागलें ?"

स०— "तें सर्व व्यर्थ व त्रासदायक आहे, असें वाटलें. ख्रिस्ती धर्म आचरायास दुष्टांची सोबत सोडली पाहिजे, असेंहि अढळलें. मी वारंवार एकांतीं देवाची प्रार्थना करूं लागलें, आणि हें मला फार गोड वाटलें. मी आपल्या पापामुळें

वारंवार रडत असें. आणि कधीं कधीं अविश्वास, संशय व पापमोह हीं मला पुन्हा कुमार्गांत आणायास झटलीं, आणि पुष्कळ अडचणी मला प्राप्त झाल्या. परंतु ज्याने मजवर दया केली होती त्याने मला आपल्याकडे प्रेमाने ओढिलें. आणि शांतीचा मार्ग दाखवून मला त्यांत चालण्याची शक्ति दिल्ही. यावरून जरी माझ्याने कांहींच करवत नाहीं, तरी त्याच्या साह्याने सर्व होइल, असें मला समजलें."

उप०—ख्रिस्ती धर्मांत आलीस यामुळें तुला कोणी उपद्रव दिल्हा नाहीं काय?

स०—"दिल्हा, रोजरोज दिल्हा. महाराज, कोणी कोणी मला हंसले, कोणी कोणी धमकाविलें, सर्वांनी माझा द्वेष केला. मी द्वेषपात्र व्हावें ह्मणून ते मला ढोंगी, साधु, बाटगी, ठक, इत्यादिक नामें ठेवीत असत. परंतु ख्रीस्ताकरितां निंदा सोसावी, यांत सन्मान आहे, असें म्यां मानिलें. ज्यानी माझा छळ केला, त्यांची क्षमा करून म्यां त्यांसाठीं प्रार्थना केली, आणि मीहि

पहिल्याने त्यांसारखीच होतें, असी आठवण केली. ख्रीस्तानेहि पाप्यांपासून दुःख सोसिलें, आणि शिष्य गुरूपेक्षां वरचढ नाहीं, असें मनांत आणून त्यासारिखें म्यां दुःख सोसावें, हें मला बरें वाटलें.

उप०—"त्या वेळेस तुझ्या घरच्या लोकांचें तारण व्हावें, असें तूं इच्छिलेंस कीं नाहीं?

स०—"होय महाराज, मी फार इच्छिलें. ही गोष्ट माझ्या मनांतून कधीं गेली नाहीं. मी त्यांसाठीं नेहमी प्रार्थना करीत असें, आणि त्यांच्या तारणाविषयीं फार उत्कंठित होतें. विशेषेंकरून माझ्या आईबापांविषयीं फार चिंता वाटली, कारण कीं तीं ह्मातारीं, व ख्रिस्ती धर्माविषयीं अज्ञानी व अंधळीं होतीं."

आ०— (स्फुंदत बोलती) "होय महाराज, ही प्रिय सगुणी, ही प्रिय सगुणी, ही प्रिय कन्या आपल्या गरीब आईबापांच्या घरीं येशू ख्रीस्ताला आणी तोंपर्यंत आह्मी खचित अज्ञानी, अंधळे, पापी, व लाचार असे होतों."

स०– "अगे आई, असें नको ह्मणूं. यापेक्षां असें ह्मण कीं, ख्रीस्ताने आमच्या कन्येला घरीं आणिलें, यासाठीं कीं, त्याने तिच्या आत्म्याला काय केलें, हें तिने आह्मास सांगावें, आणि त्याने आमच्याहि आत्म्यास तारावें."

त्याच वेळेस गवळी दूध घेऊन आंत आला. त्याने क्षणभर दारासीं उभें राहून बायकोचें व कन्येचें हें शेवटील वाक्य ऐकिलें होतें. तेव्हां तो सुसकारा टाकीत ह्मणाला.

ग०– "इला आशीर्वाद असो, आमच्या शरीराचें व आत्म्याचें साह्य करावें, ह्मणून चांगली चाकरी सोडून ही घरीं आली, ही गोष्ट खरी आहे. महाराज, ही फार रोगी दिसती कीं नाहीं ? महाराज, ही फार वेळ एथें राहणार नाहीं असें मला वाटतें."

स०– "हें प्रभूकडे सोंपून द्या. आमचें सर्व त्याच्या हातांत आहे, आणि असें असावें, हें बरें आहे. मी जायास खुशी आहें. बाबा, ज्याने

ही कन्या तुह्माला पहिल्याने दिल्ही त्याला परत द्यायास तुह्मी खुशी नाहीं कीं काय ?"

ग०—(रडत बोलतो) "दुसरा कोणताहि प्रश्न कर, परंतु असा प्रश्न करूं नको."

स०—" बाबा, खुशी व्हावें असी तुमची इच्छा आहे, हें मला ठाऊक आहे."

ग०—"होय, होय, तुजविषयीं व आह्माविषयीं ईश्वराच्या मर्जीप्रमाणें होवो."

उ०—(सगुणीला) "आतां मरण जवळ आलें आहे, असें असतां तुला समाधान होण्यास काय आधार आहे ?"

स०—"ख्रीस्तच. महाराज, तो माझा आधार आहे. माझा सर्व भरवसा त्याजवर आहे. जेव्हां मी आपणाकडे पाहतें, तेव्हां ख्रीस्ताचें प्रतिबिंब जें माझ्या अंतःकरणांत राहावें ह्मणून इच्छितें, तें माझा बहुत उणेपणा व पापें यांकडून आच्छादिलें जातें. परंतु ख्रीस्ताकडे पाहतें, तेव्हां तो फार प्रिय दिसतो. तो निष्कलंक व परम पवित्र आहे.

"तो देह धरून जगांत आला असें मनांत आणून मी दुःख सोसायास मान्य असतें, कारण कीं त्यानेंहि दुःख सोसिलें. मी परीक्षेंत आहें, तेव्हां तो माझें साह्य करायास शक्तिमान आहे, असा भरवसा होतो, कारण कीं तोहि परीक्षेंत होता. त्याच्या वधस्तंभाचें स्मरण करून मी पापाविषयीं मरायास इच्छितें, यासाठीं कीं म्यां अणखी त्याच्या स्वाधीन राहूं नये. कधीं कधीं त्याचें पुन्हा उठणें माझ्या मनांत येतें, तेव्हां त्याचा विचार त्यानें मला दिल्हा आहे, असें मला वाटतें, कारण कीं वरतीं जीं आहेत त्यांकडे माझें चित्त लागतें. तो ईश्वराच्या उजव्या हाताकडे राहून मजसाठीं विनंती करीत आहे, आणि जी भोळी प्रार्थना मी आपणासाठीं व या गरीब आईबापांसाठीं करितें, ती स्वीकारवीत आहे, असें मनांत आणून मला विशेष सुख वाटतें.

"याप्रमाणें मी आपल्या तारणाऱ्याच्या कृपेविषयीं विचार करीत असतें. त्यावरून त्याची

सेवा सर्व शक्तीने करावी आणि आपणाला त्याला सोपून द्यावें, असी इच्छा उत्पन्न होती."

"जर त्यानें मला राखलें नसतें, तर हजारों वेळ अडखळून मी निराश झालें असतें. त्याशिवाय मला दुसरा कोणी नाहीं. तो माझा एकच आश्रय आहे."

"जसी जसी त्याजवर चिंता टाकितां येती, तसी तसी त्याच्या इच्छेप्रमाणें करायास शक्ति मिळती. मरणापर्यंत त्याजवर भरवसा ठेवावा, ह्मणून त्याची कृपा असावी. मला मरणाचें भय काडीमात्र वाटत नाहीं, कारण कीं त्याने त्याची नांगी नाहींसी केली, हें मला ठाऊक आहे. पुढें केवढें सुख होईल! महाराज, हें माझें मत योग्य आहे कीं नाहीं, हें मला सांगा. म्यां न फसावें. येशू ख्रीताच्या पुण्याशिवाय मला दुसरी कोणतीहि आशा नाहीं. अंतःकरणाला विचारिलें असतां मला भय वाटतें. कारण कीं तें खोटें व ढोंगी आहे. त्याने मला वारंवार फसविलें आहे, परंतु ख्रीस्ताला विचारलें असतां, तो

मला मोलवान वचनें देतो. तेणेंकरून मला शक्ति व समाधान होतें. आणि तो मला तारायाला शक्तिमान व खुशी आहे, याविषयीं कांहीं संशय राहत नाहीं. मी त्याच्या हातांत आहें, आणि तेथें राहायास इच्छितें. तो मला कधीं सोडणार नाहीं, परंतु तारीलच तारील असा भरवसा आहे. त्यानें मजवर प्रीति केली आणि मजसाठीं मरण सोसिलें. त्याची देणगी व बोलावणें पालटत नाहीं असी माझी खातरी आहे. ही आशा धरून मी जगतें आणि हीच आशा मरणसमयीं धरावी, असें मी इच्छितें."

याप्रमाणें तिचें बोलणें ऐकून मला वाटलें कीं 'हें खचित देवाचें घर आहे, आणि हा आकाशाचा दरवाजा आहे.' चहूंकडे पाहिलें, तों सर्व स्वच्छ व निर्मळ व मनोरंजक दिसलें, आभाळ कांहीं भरलें होतें, परंतु मावळणाऱ्या सूर्याचे किरण त्या खोलींत अकस्मात चकचकीत प्रकाशले, आणि भिंतीकडल्या तक्त्यावरील जस्ती व दुसऱ्या प्रकारच्या पांढऱ्या पात्रां-

वर पडण्याकडून प्रतिबिंबित झाले. या मावळणाऱ्या सूर्याचें चमकणें, हें या तरुण ख्रिस्तिणीच्या शांत व सुखाच्या मरणासारिखें आहे, असें दिसलें. एक कवडसा लाहान आरशांतून तिच्या तोंडावर पडला आणि तिच्या चेहऱ्यावरून संतोषवृत्ति, पूर्ण भरवसा आणि नम्रता हीं दिसून आलीं.

अणखी कांहीं संभाषण झाल्यावर म्यां त्यांबरोबर प्रार्थना केली व सलाम करून माझ्या घरीं येण्यास निघालों. तेव्हां दिवस मावळत होता आणि सर्व निवांत दिसलें. गुरांचें हळू हंबरणें, वाड्यांत कोंडलेल्या मेंढरांचें बें बें करणें, रात्रिंचर जीवांचें गुणगुणणें, समुद्राची दूरची गर्जना, दिवसांतील पक्ष्यांचे शेवटील स्वर आणि बुलबुलांचें पहिलें गाणें, हीं सर्व माझ्या कानीं पडलीं, आणि यामुळें तो संध्याकाळ फार रमणीय दिसला. तेव्हां माझ्या मनांत गंभीर विचार उत्पन्न झाले. देवाच्या कामावरून त्याच्या शास्त्राविषयीं चांगले दाखले मिळतात.

जेव्हां त्यावरून बोध व सुख होतें तेव्हां बरें वाटतें.

नंतर कांहीं दिवसानी असें वर्त्तमान आलें कीं, सगुणी अगदीं मरायास टेंकली आहे. हें वर्त्तमान एका शिपायाने आणिलें. त्याच्या चेहऱ्यावरून तो गंभीर, समंजस आणि धार्मिक असा दिसला. तो ह्मणाला,

शि०—महाराज, सगुणीच्या आईबापानी तिच्या सांगण्यावरून मला आपल्याकडे पाठविलें आहे. ते सर्व आपल्याला पाहायास उत्कंठित आहेत. महाराज, सगुणी सर्वकाळच्या घरीं जात आहे.

उप०—तिची व तुमची ओळख बहुत दिवसांपासून आहे कीं काय?

शि०—महाराज, सुमारें एक महिन्यापासून आहे. रोगी लोकांचा समाचार घ्यायास मला फार आवडतें, आणि तिची गोष्ट एका धार्मिक शेजाऱ्याकडून ऐकल्यावरून मी तिला भेटायास गेलों. यावरून मी ईश्वराची स्तुति करितों,

कारण कीं तिचें संभाषण मला फार उपयोगी झालें.

उप०— तुह्मी ख्रिस्ती भाऊ आहां, असें दिसतें, आणि यावरून मला आनंद वाटतो. आमचीं बाहेरील चिलखतें वेगळीं आहेत, तरी आह्मांला एकच सेनापति, ह्मणजे येशू ख्रीस्त आहे, असें मला वाटतें. चला मी तुह्माबरोबरच येतों.

मग माझा घोडा लवकर तयार झाला आणि मी त्या शिपायाबरोबर निघालों. त्याचें समंजस व धार्मिक संभाषण ऐकून मला संतोष वाटला. त्याने त्या गवळ्याच्या कन्येच्या चांगल्या स्वभावाविषयीं कांहीं विशेष लक्षणें सांगितलीं. तो ह्मणाला, "महाराज, ती चमचकीत हिरा आहे. आणि पृथ्वीवर सर्वांहून मोलवान हिऱ्यापेक्षां ती लवकर फार तेजस्वी होईल."

अस्या संभाषणावरून वाट लवकर संपली, आणि गवळ्याची झोंपडी दिसून आली. या घरांत ख्रिस्ती मनुष्य मरणास टेंकले आहे, असें

समजून मरण, तारण आणि अनाद्यंतता यांविषयींच्या कल्पनानीं माझें मन भरलें, आणि सोबत्याचेंहि भरलें, असें वाटतें.

तेथें गवळ्याच्या कुत्र्याशिवाय दुसरा प्राणी माझ्या दृष्टीस पडला नाहीं. तो मुकाट्यानें दार राखीत होता. तो पूर्वीप्रमाणें मजवर भोंकला नाहीं. तो आवाराच्या दाराकडे आला, आणि आज घरांत फार दुःख आहे, अस्या सांगण्यासारिखें घराकडे पाहिलें. तुह्मी हळू चला, माझ्या धन्याचें अंतःकरण दुःखानें भरलें आहे, असें बोलण्यासारिखा तो दिसला.

ती जागा मला फार उदास दिसली. मी हळूच दार उघडलें पण आंत कोणी दिसला नाहीं. चहूंकडे सामसूम होती. मग मी हळूच दार ढांकिलें असतां, "ते आले, ते आले" असा शब्द माझ्या कानीं पडला. तो ह्मातार्‍या गवळ्याचा आहे, असें म्यां ओळखिलें. तेव्हां त्यानें येऊन माझा हात धरिला, पण कांहीं बोलला नाहीं. मग आंत गेलों, तों तो ह्मातारा

आई व तिचा पुत्र हीं त्या प्रिय कन्येला टेंका देऊन बसलीं आहेत, असें दिसून आलें. तिची भावजय आपलें लेंकरूं मांडीवर घेऊन जवळ रडत बसली होती, आणि अणखी दोन तीन मित्र सहाय करण्यासाठीं जवळ उभे होते.

मी सगुणीजवळ बसलों, तिची आई दुःखानें व्यापली असतां, तिच्यानें रडवेना, परंतु मजकडे व कन्येकडे वारंवार पाहून सुस्कारे टाकीत असे. भावाच्या डोळ्यांतून पुष्कळ आसवें वाहत होतीं, आणि तो भला म्हातारा जवळ उभा राहिला असतां, त्याच्यानें आपल्या प्रिय कन्येपासून दृष्टि काढवेना.

सगुणीनें आपले डोळे झांकले होते म्हणून तिनें मला पाहिलें नाहीं. परंतु तिच्या निस्तेज चेहऱ्यावरून जी ईश्वरी शांति समजण्यापलीकडे आहे, ती तिला झाली आहे, असें दिसून आलें. मग त्या शिपायानें अमळ थांबून आपलें शास्त्राचें पुस्तक मजकडे केलें, आणि करिंथकरांस पहिलें

पत्र याचा १५ अध्याय ५५,५६,५७, या ओ-ळ्यांकडे बोट दाखविलें. तेव्हां मी वाचूं लागलों. 'अरे मरणा, तुझी नांगी कोठें? अरे मृतलोका, तुझा जय कोठें? तर मरणाची नांगी पाप आहे, आणि पापाचें सामर्थ्य नेमशास्त्र आहे. परंतु देव जो आमच्या प्रभु येशू ख्रीस्ताकडून आह्मास जय देतो त्याची उपकारस्तुति असो!' असें माझें वाचणें ऐकून सगुणीनें आपले डोळे उघडले, आणि जय, जय, होय प्रभु येशू ख्रीस्ताकडून जय आहे, असें बोलत असतां तिच्या चेहऱ्यावर दिव्य किरण प्रकाशले आहेत, असें दिसलें.

तिनें कोणाकडेहि न पाहतां, पुन्हां डोळे झांकले. तेव्हां मी ह्मणालों, "विश्वासाच्या जयामुळें ईश्वराची स्तुति असो." तो शिपाई ह्मणाला, "आमेन."

थोड्या वेळानें सगुणी मोठ्या श्रमानें श्वास टाकून विसांवा पावल्यावर मी तिला ह्मणालों.

उप०—माझ्या प्रिय मित्रिणी, तुला समाधान वाटतें कीं नाहीं?

स०—होय, प्रभु मजसीं फार कृपाळूपणानें वागतो.

उप०—आतां त्याचीं वचनें फार मोलवान आहेत कीं नाहींत ?

स०—होय, तीं सर्व ख्रीस्त येशूकडून खचीतच आणि आमेन असीं आहेत.

उप०—तुला फार दुःख होतें कीं काय ?

स०— नाहीं, फार थोडें, असें कीं मी तें बहुतकरून विसरतें.

उप०—प्रभु किती कृपाळू आहे !

स०—मी किती अयोग्य आहें !

उप०—त्याला पाहायास तूं आतां जात आहेस.

स०—मी जात आहें, असें मला वाटतें. असी आशा—असा भरवसा आहे.

मग तिला पुन्हा थोडी डुकली आली, तेव्हां मी तिच्या आईकडे पाहून ह्मणालों.

उप०—तुमची कन्या इतके लवकर आकाशलोकांत जात आहे यांत ईश्वराची केवढी दया!

आ०—(फार रडत व तुटक शब्दांनी) मी तिची गरीब म्हातारी आई तिच्या अगोदर जावी. परंतु महाराज, तिने मला सोडून जावें, हें किती कठीण ?

उप०—ईश्वराच्या कृपेने थोड्या वेळाने तुमची तिची भेट होईल, असी माझी आशा आहे, आणि तेथें पुन्हा कधीं वियोग होणार नाहीं.

ग०—महाराज, अस्या विचारावरून मला समाधान होतें. आणि मी तिच्या मरणाविषयीं पहिल्यापेक्षां अधिक मान्य आहें.

स०—(शुद्धीवर येऊन) अहो बाबा, —अगे आई—तो मजवर कृपाळू आहे—तुह्मी त्याजवर आशा ठेवा. त्याची स्तुति सर्वकाळ करा. (हळू बोलती), महाराज, आपले उपकार मानायास मी इच्छितें. आणि मी आपणापासीं एक अर्ज करितें. आपण माझ्या बहिणीला माती दिल्ही, तसी कृपा करून मला द्यावी.

उप०—ईश्वराची इच्छा असेल, तर तुझ्या मर्जीप्रमाणें होईल.

स०—महाराज, आपले फार उपकार मानितें. अणखी एक अर्ज आहे. मी मेल्या-वर आपण माझ्या आईबापांस विसरूं नये. तीं फार ह्मातारीं आहेत. पण त्यांमध्यें चांगलें काम होऊं लागलें आहे, असें मला वाटतें. ईश्व-राने माझी प्रार्थना ऐकली आहे—आपण कृपा करून वारंवार त्यांच्या भेटीस यावें—महा-राज, माझ्याने फार बोलवत नाहीं. परंतु मी त्यां-करितां एवढें बोलायास इच्छितें—महाराज, त्यांची आठवण ठेवावी.

हें ऐकून तिचीं ह्मातारीं आईबापें सुस्कारा टाकून मोठ्याने रडलीं. मग मी तिला ह्मणालों,

"तुझ्या तारणाविषयीं तुला कांहीं संशय वा-टतो कीं काय?"

स०—नाहीं, नाहीं, महाराज, प्रभु मजसीं कृपाळूपणाने वागतो आणि मला शांति देतो.

उप०—आतां तूं मरणछायेच्या अंधाररूप खिंडींतून चालत असतां, ती तुला कशी वाटती?

स०—ती अंधाररूप नाहीं.

उप०—हें कसें?

स०—माझा प्रभु आहे, तो माझा दिवा व तारण असा आहे.

उप०—अधिक दुःख होईल असें कांहीं भय वाटतें कीं काय?

स०—प्रभु मजसीं फार कृपेने वागतो, त्याजवर मी भरवसा ठेवितें• (मग कांहीं काळ येऊन राहिल्यावर ती पुन्हा ह्मणाली), प्रभु मजसीं फार दयेने वागतो. हे प्रभु, मी तुझी आहें. मला तार—हे धन्य येशू—त्याचें रक्त सर्व पापांपासून शुद्ध करितें—त्याचा माझा वियोग कोण करील—त्याचें नांव आश्चर्यमंत्री —ईश्वराची उपकारस्तुति असो—तो आह्मास जय देतो—मी, मी देखील तारण पावलें आहें.—आहाहा, केवढी कृपा, दया, आश्चर्यवंत दया. हे प्रभु, माझा आत्मा घे—प्रिय महाराज,

प्रिय बापा, अगे आई, अहो मित्रानो, मी जात आहें—परंतु सर्व बरें, बरें, बरें—

मग ती मूर्च्छित झाली आणि आह्मी गुडघे टेकून प्रार्थना केली. प्रभूने आह्माजवळ होऊन आशीर्वाद दिल्हा.

तिची वाचा बंद झाल्यावर सुमारें एका तासाने मी तेथून निघालों. त्या वेळेस मी तिचा हात धरून ह्मणालों, "ख्रीस्त हा पुन्हा उठणें आणि जीवन, असा आहे." तिने माझा हात हळूच दाबला परंतु तिच्याने डोळे उघडवले नाहींत, किंवा एक शब्द बोलवला नाहीं.

सगुणी पुन्हा शुद्धीवर आली नाहीं आणि समजण्याजोगा असा एकहि शब्द अणखी बोलली नाहीं. ती कांहीं वेळ निजली, मग प्रभूवर आशा ठेवून शांतीने मरण पावली. मी अगोदर असी गोष्ट कधीं पाहिली नव्हती. घरीं जातांना ती माझ्या मनांत अगदीं भरली.

म्यां मनांत ह्मटलें, 'प्रिय मित्रिणी, आकाशलोकांत तुझी माझी भेट होईल तोंपर्यंत तुला

माझा सलाम. तूं आकाशलोकांमध्यें ताऱ्यासारिखें चकचकावें ह्मणून तूं अग्नींतून काढिलेलें कोलीत असी आहेस. म्यां तुझा उजेड आणि चांगलीं कामें पाहिलीं ह्मणून मी आमच्या आकाशांतील बापाचें गौरव करीन. पापी मनुष्य देवाच्या कृपेने कसा तारला जातो, हें तुझ्या उदाहरणावरून समजतें. विश्वास व प्रीति कोण उत्पन्न करितो, व वाढवितो, आणि सिद्धीस नेतो, हें तुझ्या गोष्टीवरून प्रतीतीस आलें आहे. येशू हा सर्वांस पूर्ण आधार आहे. त्याचें गौरव होईलच होईल. त्याने मुगुट मिळविला आहे, आणि तो घालण्याजोगा तोच आहे. त्याचें गौरव लुटायास कोणी प्रयत्न करूं नये, तो तारितो, पूर्णपणाने तो तारितो. प्रिय ख्रिस्ती बहिणी, सलाम. तुझा देह व अंतःकरण खर्चावें; परंतु ईश्वर तुझ्या अंतःकरणाची शक्ति आणि तुझा वांटा सर्वकाळ होईल.

कांहीं वेळाने सगुणीला मूठमाती देण्यासाठीं त्यांनी मला बोलाविलें, तें काम करितांना सुख-

दु:खकारक असे बहुत विचार माझ्या मनांत आले. जीं पुष्कळ हितकारक संभाषणें तिजशीं झालीं होतीं, त्यांचें स्मरण झालें. मंदिरांत किंवा झोपडींत असो, ख्रिस्ती मनुष्याची मैत्री किती मनोरंजक आहे, असें मनांत आणून, मला सगुणीची मैत्री इतके दिवस होती, यावरून देवाचे उपकार मानिले. तिला धर्माचा इतका चांगला अनुभव झाला असतां, तिचें संभाषण मी अणखी ऐकणार नाहीं, असें समजून कांहीं खेद वाटला. परंतु तिला आतां अक्षय सुख मिळालें आहे आणि म्यां तिला या दु:खी जगांत परत आणावें कीं काय? असें मनांत आणून मी तृप्त झालों.

मी तिला मूठमाती द्यायास गेलों तेव्हां कांहीं मित्र जमले होते. त्यांनी सगुणीचें प्रेत पुरायास तयार करून ठेविलें होतें. मी शेवटील अवलोकन करायास प्रेताजवळ गेलों. जेव्हां ख्रिस्ती माणसाच्या प्रेताजवळ उभे राहतों, तेव्हां ख्रीस्त, आणि तारण, मरण, आणि न्याय ठरविणें,

आकाशलोक आणि नरक यांविषयीं भारी विचार मनांत येतात.

सगुणीचा चेहरा कांहीं बदलला होता, तरी बहुतकरून पहिल्यासारिखाच दिसला. तिचें आईबाप तिच्या डोक्याकडे आणि भाऊ पायांकडे असे रडत बसले होते. त्या म्हाताऱ्या व अशक्त आईबापांचें दु:ख पाहून मला त्यांची दया आली.

तेव्हां एक ठाकाठिकीची व मर्यादशीळ बायको मजकडे येऊन ह्मणाली.

"महाराज, ही गोष्ट दु:खाची नव्हे पण आनंदाची आहे, असें आमच्या प्रिय सगुणीच्या अनुभवास आलें, याविषयीं मला संशय वाटत नाहीं. ती सर्व दु:खांपलीकडे गेली आहे, असें तुह्मांला वाटत नाहीं काय,महाराज?

उप०—जरी तिचें प्रेत एथें आहे, तरी जें म्यां पाहिलें व ऐकिलें, त्यावरून तिचा आत्मा तारणाऱ्याकडे सौख्य लोकांत गेला आहे,असा पक्का भरवसा होतो. तिने एथें ख्रीस्तावर प्रीति

केली आणि आतां त्याच्या उजव्या हाताकडे बसून अक्षय सुख भोगीत आहे.

आ०—(स्फुंदत बोलती), दया, दया, मज म्हाताऱ्या दुःखित प्राण्यावर दया असो. मी काय करूं ? माझी सगुणी गेली. माझी प्रिय कन्या मेली आहे. आहाहा, अगे कन्ये, तूं माझ्या दृष्टीस कधीं पडणार नाहींस. हे ईश्वरा, मजवर दया कर.

उप०—"बाई, ह्या तुझ्या प्रार्थनेकडून तिची व तुझी भेट पुन्हा होईल. अस्या प्रार्थनेकडून हजारों लोक तारण पावले आहेत. तुझी कन्या तारण पावली आहे आणि तूंहि पावसील, असी माझी आशा आहे. जे ख्रीस्ताकडे येतात त्यां-तून कोणी एकालाहि तो कधीं घालविणार नाहीं.

ग०—अगे, आह्मी आपल्या कन्येला आणि आपणांसहि प्रभूला सोपून देऊं. प्रभूने दिल्हें आणि प्रभूने घेतलें आहे, त्याची स्तुति असो. आपण म्हातारे झालों आणि आमची मजल लव-कर संपेल. (त्याच्याने अणखी बोलवेना.)

मग तो शिपाई मला शास्त्राचें पुस्तक देऊन

ह्मणाला, "महाराज, कृपा करून आपण एक अध्याय वाचावा." तेव्हां मी तें शास्त्र घेऊन योहानाचा चवदावा अध्याय वाचिला. त्या वेळेस अगदीं शांति होती. मी तेथें होतों तोंपर्यंत प्रत्येक क्षण मोलवान आहे, असें मला वाटलें. मी त्या अध्यायावरून थोडा उपदेश करून आमच्या त्या मेलेल्या मित्रिणीविषयीं कांहीं बोललों.

मग तो शिपाई ह्मणाला, "मी केवळ गरीब शिपाई आहें, आणि रोजच्या निर्वाहापेक्षां मजजवळ कांहीं नाहीं, असें असतांहि परलोकीं तारण होईल, ही आशा सोडायास जरी सर्व जग मला देऊं केलें तरी सोडणार नाहीं. जर ईश्वराची कृपा नाहीं तर द्रव्य काय कामाचें? जेथें जेथें मी जातों तेथें तेथें प्रभु आहे. आणि आज तो आह्मा जीवंतांमध्यें व मेलेल्यांमध्यें आहे, त्याची स्तुति असो. एथें असावें यांत मला सुख वाटतें."

मग दुसरे कितीएक लोक संभाषण करूं लागले. त्यांनी त्या गवळ्याच्या कन्येचा चांगला स्वभाव व वर्त्तणूक यांविषयीं साक्ष दिल्ही.

त्या वेळेस एक तरूण स्त्री, जी पूर्वीं आपल्या तारणाविषयीं अगदीं निष्काळजी होती तिच्या मनांत देवाची गोष्ट ठसली. त्या दिवसापासून तिने पापमार्ग सोडून ख्रीस्तावर खरा विश्वास ठेविला, असें प्रमाण पटलें.

मूठमाती देण्याची वेळ आली, आणि मी अणखी शेवटील अवलोकन करायाला प्रेताजवळ गेलों. तिच्या हास्यमुख चेहऱ्यावरून शांति दिसली. तिचे शेवटील शब्द माझ्या मनांत आले, आणि खचित 'मरण जयाने गिळलें आहे,' असें मला वाटलें.

जें गीत सगुणीने अगोदर निवडून घेतलें होतें, तें आह्मी कबरेजवळ गायलें, आणि ती पुन्हा आनंदाने उठेल असी आशा धरून आह्मी तिला मूठमाती दिल्ही.

याप्रमाणें तिचा आमचा वियोग कांहीं वेळ-पर्यंत झाला. ती आमच्या दृष्टीपासून गेली आहे. परंतु शेवटील दिवसीं आपल्या तारणाऱ्याच्या उजव्या हाताकडे पुन्हा दिसेल.

माझ्या वाचणाऱ्या, तूंही तेथें होसील. तूं नम्रता पांघरलेला आहेस कीं काय? तूं लग्नवस्त्र ह्मणजे ख्रीस्ताचें पुण्य नेसलेला आहेस कीं काय? तूं मूर्तीपासून जिवंत ईश्वराकडे वळला आहेस कीं काय? मी पापी व लाचार आहें असें समजून तूं ख्रीस्ताकडे शरण गेला आहेस कीं काय?

माझ्या वाचणाऱ्या, गवळ्याची कन्या गरीब व गरीबांची लेंक होती, याविषयीं तूं तिजसारिखा आहेस, परंतु ती ख्रीस्ताला अनुसरली याविषयीं तूं तिजसारिखा आहेस कीं काय? तूं विश्वासानें धनवान आहेस कीं काय? तुझें मन आकाशांतील द्रव्याकडे लागतें कीं काय? जर असें नसेल तर ही गोष्ट पुन्हा वाच, आणि असा अमूल्य विश्वास तुला प्राप्त व्हावा ह्मणून आग्रहानें प्रार्थना कर.

परंतु ज्या तारणाऱ्यानें गवळ्याच्या कन्येला तारिलें, त्याची प्रीति व सेवा तूं करीत आहेस, तर तुला दया व कृपा व शांति होवो. तुला

फार आशीर्वाद प्राप्त झाला आहे. तूं ख्रीस्ताची सेवा करीत जा.

ख्रीस्तावर जे विश्वास ठेवितात त्यांचें मरण कसें होतें, हें तूं आतां पाहिलें आहेस. तर तुलाहि मरण लवकर येईल आणि ईश्वरासमोर तुला हिशोब द्यावा लागेल, याची आठवण करीत जा.

**सूचना.** सगुणी मेल्यावर सुमारें साहा महिन्यानी तिची आईहि मरण पावली. ती खरी ख्रिस्ती होती, आणि देवाने तिलाहि आपल्यापासीं नेलें, असें समजण्यास चांगला आधार आहे. प्रत्येक ख्रीस्ती मुलाने सगुणीसारिखे आपल्या पापी आईबापांच्या तारणाविषयीं श्रम आणि प्रार्थना करीत जावी.

तिचा बाप अणखी कांहीं दिवस वांचला आणि शुभवर्तमानास योग्य असा आपल्या ज्ञातारपणीं वागला. तो अझून जीवंत आहे किंवा नाहीं, हें मला माहीत नाहीं. परंतु आकाश लोक जेथें

उद्धारलेले लोक अक्षय सुख भोगितात, तेथें त्या कन्येची व तिच्या आईबापांची भेट यापूर्वीं झाली असेल.



# मर्यादशीलता.



म्हाताऱ्याने शिकवावें आणि तरण्याने तें ऐकून मानावें यांत बरें आहे. जीं तरणीं माणसें नम्र असून लोकांस यथायोग्य मान देतात तीं सर्वांस आवडतात.